# ‘ठाकुर’ आदिवासी जमाती मधील महिलांमध्ये आढळून येणाऱ्या व्यसना संबंधी समस्या

**श्रीमती मोनाली नंदकिशोर देशमुख**
इंदिरानगर, नाशिक

---

**प्रास्ताविक :**

माणसांची भ्रमंती संपल्यानंतर तो कोठे ना कोठे तरी स्थिर होऊ लागला. निश्चित अशी उदरनिर्वाहाची साधने लाभल्यानंतर माणसाच्या आयुष्याला स्थिरता लाभली. जगाच्या कोणत्या ना कोणत्या तरी भूभागावर त्याने आपले पाय रोवले. काहींनी निसर्गाचे वरदान लाभलेल्या मोजक्या लोकवस्तीची खेडी पसंद केली. तर काहींनी उद्योगधंद्यांमुळे शहरे संपन्न केली. पण काही भूमिपुत्रांनी या सर्व लोकवस्तीपासून दूर व दुर्गम असलेल्या डोंगर कपाऱ्यात नद्या-नाल्यातील कडेकपाऱ्यात तळ ठोकला. धरतीची लेकरे म्हणून ज्याचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल अशी आदिवासी समाजाने निसर्ग सानिध्यात आपली दूनिया थाटली. नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या आदिवासींना कोणी ‘जंगलचे राजे’ म्हणतात. तर कोणी त्यांना ‘भूमिपुत्र’ मानतात. रीसले, लेस्सी, अल्वीन, मार्टिन, ए. व्ही. ठक्कर हे आधी त्यांना अगदी प्राचीन किंवा अगदी मूळचे रहिवासी म्हणतात. हटनी त्यांना ‘आदिवासी’ असे नामाभिधान केले आहे. डॉक्टर घुर्ये त्यांना तथाकथित मूळचे रहिवासी व ‘मागासलेले हिंदू’ असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेत यांचा उल्लेख ‘अनुसूचित जमात’ असा केला आहे.धारगाव तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक या गावाच्या परिसरामध्ये ‘ठाकूर’ ही आदिवासी जमात वास्तव्य करते. आदिवासी जमातीतील लोक मनोरंजन म्हणून व्यसनाच्या आहारी गेलेल्या आढळतात. त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. यात काही प्रमाणात मद्यप्राशन करणे, मिश्री, काळी कोळशाची,तपकिरीची पूड लावणे, गुटखा खाणे इत्यादी व्यसने या आदिवासी जमातीतील लोक करतात.

**संशोधनाची गरज :**

आदिवासींचा जर जवळून अभ्यास केला तर त्यांच्याकडे काही आदर्श बाबी आहेत अशी प्रचिती येते. लिपी नसलेल्या त्यांच्या बोली भाषेतून वाडमय नाही हे खरे. पण कला, ज्ञान, लोककथा,नृत्ये, म्हणी व वाक्प्रचार हे सौष्ठव त्यांच्या भाषेला लाभलेले आहे. उदरनिर्वाहाची भ्रांत असलेल्या आदिवासींचे सामाजिक जीवन परिपूर्ण आहे. रक्त संबंधांना विशेष महत्त्व देणारे हे आदिवासी सामूहिक जीवनात वैयक्तिक आकांक्षा डोकाऊ देत नाहीत. दोन घराण्यांना एकत्र बांधणारा दुवा म्हणून ते विवाहकडे पाहतील. तर सामूहिक जीवन गुणागोविंदाचे असावे म्हणून धर्माचरण, रितीरिवाज इत्यादीचे पालन कटाक्षाने करतील. स्वैर जीवन त्यांना संमत नाही. म्हणून तर त्यांच्या जीवनाचा समतोल ढळत नाही. उलट रानटी व रांगड्या आदिवासींचे भावविश्व संपन्न झाले आहे. जादूटोणा, मंत्रतंत्र, अति भौतिक विश्व, प्राणी, जमीन व वातावरण यासंबंधीचे त्यांचे ज्ञान व अंदाज स्तिमित करून सोडणारे आहे. प्रामाणिकता, निष्कपटीपणा, विनोद, मोकळेपणा,व्याभिचार व वेश्याव्यवसाय यांचा अभाव, स्त्रियांचा उच्च दर्जा, तिचा सहचारी म्हणून, पत्नी म्हणून व माता म्हणून तिचा आदर करण्याची रीत, युवा गृहातील सांस्कृतिक कार्य इत्यादी त्यांचे गुण कोणत्याही समाजाला आदर्श ठरावेत. खायला नाही, प्यायला नाही

तरीपण उल्हास व आनंद यांनी परीतृप्त झालेले, गाणी व नाच यांनी नटलेले सामाजीक व्यवस्थेने बद्ध झालेले आदिवासींचे जीवन एक प्रकारे परिपूर्ण आहे असे वाटते. एवढ्या सगळ्या सकारात्मक गोष्टी असूनही ते लोक काही प्रमाणात व्यसनांच्या आहारी गेलेली दिसून येतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. त्यांचा खूप मोठा वेळ व्यसनी करण्यात जातो. त्यामुळे एक प्रकारची उदासीनता त्यांच्या जीवनात दिसून येते. ह्या व्यसनात मद्यप्राशन करणे, मिसरी लावणे, गुटखा खाणे इत्यादी बाबी प्रकर्षाने दिसतात. व्यसनांमुळे आदिवासींच्या समोर असणाऱ्या प्रश्नांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. कारण त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेकविध बाबींना त्यामुळे धक्का पोहोचला आहे.

**समस्या विधान :**

ठाकूर आदिवासी जमाती मधील महिलांमध्ये आढळून येणाऱ्या व्यसनांसंबंधी समस्या

**संशोधनातील कार्यात्मक व्याख्या–**

1. **आदिवासीसमुदाय–**

धरतीला खऱ्या अर्थाने आपली माता मानणारे हे आदिम जनआदिवासी, जन्मभर नाचणारी, गाणारी, राकट शरीराची पण निरागस मनाची माणसं, प्रगतीकडे जाणाऱ्या आधुनिक शिक्षणाच्या पहिले पाऊल टाकण्याआधी धार्मिक चालीरीती, मागासलेपणा, आर्थिक दुर्बलता, भुतेखेते व देवदेवतांच्या जंजाळातून बाहेर पडावे किंवान पडावे या संभ्रमात वेळ घालविणारे माणसं, ही निसर्गपूजक, संस्कृतीशी, निसर्गाशी एकरूप झालेली भोळीभाबडी माणसं, वरुढी प्रिय समाज म्हणून 'आदिवासी' असे ओळखले जातात.

**उद्दिष्टे –**

2. व्यसनाधीनतेमुळे आदिवासींचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक नुकसान होते हे अभ्यासणे.
3. व्यसनाधीनतेमुळे प्रामुख्याने आदिवासी स्त्रियांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो हे अभ्यासणे.

**गृहीतके :**

व्यसनाधीनतेमुळे आदिवासींचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक तसेच आरोग्यविषयक नुकसान झाले.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

ठाकूर आदिवासीजमाती मधील महिलांमध्ये आढळून येणाऱ्या व्यसनांसंबंधी समस्या हा प्रकल्प धारगाव तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक या परिसरातील आदिवासी लोकांच्या आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक तसेच आरोग्य विषयक घटका पुरताच मर्यादित आहे.

**माहिती संकलनासाठी वापरलेली साधने–**

**विश्लेषण–**

आदिवासी महिलांमध्ये आढळून आलेल्या व्यसनांच्या प्रमाणामुळे त्यांच्या आरोग्यविषयक तक्रारी वाढीस लागलेल्याआहेत. गर्भवती महिला व्यसन करताना आढळणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यांच्या अपत्त्यावर याचा निश्चितच अहितकारक परिणाम दिसून येतो. परिणामी कुपोषण, जन्मजात दोष इत्यादी गोष्टी आढळतात.व्यसनांमुळे त्यांची कार्यक्षमता मंदावते. त्या निस्तेज होतात. याचा परिणाम त्यांच्या सामाजिक तसेच सांस्कृतिक जीवनावर होतो.

**निष्कर्ष :**

उपरोक्त विषयावर केलेल्या अध्ययननुसार असे दिसून येते की, आदिवासींचे जीवन जगण्याची पद्धती व त्यांचे सांस्कृतिक कार्य, त्यांचे निसर्गाप्रती असलेले प्रेम व ज्ञान इत्यादी बाबी अफलातून आहेत. परंतु त्यांच्यातील व्यसनाधीनतेमुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. पर्यायाने त्यांचे जीवनमान खालावते. आर्थिक व सांस्कृतिक बाबींवर सुद्धा विपरीत परिणाम होतो.

**संदर्भ :**


- सामाजिक आंदोलने, डॉक्टर रघुनाथ नाडगोंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन**2]** भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, डॉक्टर बी. एम. कऱ्हाडे, नागपूर प्रकाशन,2009
- भारतातील आदिवासी समाज, सुधाकर जाधव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद,2015